गडचिरोली
महासागर जिल्हा विशेष
रविवार, दि. २९ जून २०२५



## रोटरी क्लब गडचिरोलीतर्फे विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वितरण

**गडचिरोली:** वाचन संस्कृती जोपासण्यासाठी रोटरी क्लब गडचिरोलीच्या वतीने जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा पारडी येथे १०,००० रुपयांचे पुस्तक वाटप करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि ज्ञानार्जनासाठी प्रेरणा मिळावी, या हेतूने हा उपक्रम राबवण्यात आला.

कार्यक्रमात रोटरी क्लबचे अध्यक्ष सुनील बट्टूवार, सचिव विश्राम होकम, सदस्य मनीष उत्तरवार, चार्टर्ड प्रेसिडेंट दिवाकर बारसागडे, उपाध्यक्ष रोटरी क्लब ३०३० डिस्ट्रिक्ट नंदकिशोर काबरा, सतीश चीचगरे, रीना चीचघरे, प्रसाद पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात शालेय वाचनालयासाठी विविध प्रकारची ज्ञानवर्धक व प्रेरणादायी पुस्तके देण्यात आली. यावेळी सुनील बट्टूवार यांनी विद्यार्थ्यांनी पुस्तके हीच खरी संपत्ती मानून वाचनाची सवय जोपासावी, असे आवाहन केले. सचिव विश्राम होकम यांनीही रोटरी क्लबचा समा. जोपयोगी कार्यांमध्ये नेहमीच सक्रिय सहभाग असल्याचे सांगितले.

# जांभूळखेडा भूसुरुंग स्फोटातील आरोपीस अटक

### १५ जवानांच्या हत्येत होता सक्रिय सहभागः शासनाने जाहिर केले होते ६ लाखांचे बक्षीस



**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.** २८ : छत्तीसगड सीमेवरील कवंडे येथे घातपात घडवून आणण्याकरिता रेकी करत असताना एका जहाल माओवाद्याला २७ जून रोजी पो. लिसांनी अटक केली. अंकूल उर्फ मन्नु सुलगे पल्लो (२८) रा. कवंडे ता. भामरागड असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. कुरखेडा तालुक्यातील जांभूळखेडा येथे सहा वर्षापूर्वी भूसुरुंग स्फोटात १५ जवान शहीद झाले होते. या हल्ल्यातही त्याचा सक्रीय सहभाग होता.

भामरागड अंतर्गत नवनिर्मित पोस्टे कवंडे हद्दीतील कवंडे जंगल परिसरामध्ये विशेष अभियान पथकाची दोन पथके, पोस्टे कवंडे येथील पोलीस पथक आणि सी कंपनी ३७ बटा. सिआरपीएफचे एक पथक माओवादविरोधी अभियान राबवित असताना त्यांना एक संशयित व्यक्ती फिरत असताना आढळून आल्याने पथकाच्या जवानांनी त्याला ताब्यात घेतले होते. त्यानंतर त्याची अधिक सखोल चौकशी करण्यासाठी पोलीस मुख्यालय गडचिरोली येथे आणले असता ते अंकल ऊर्फ मन्नू सुलगे पल्लो असल्याचे निष्पन्न झाले. सध्या तो कोरची दलममध्ये उपकमांडर म्हणून कार्यरत होतो. कवंडे जंगल परिसरात घापात करण्याकामी रेकी करण्यासाठी आल्याची कबुली त्यांनी दिली. त्याच्यावर पाच गुन्हे नोंद असून तपासकामी त्यास कुरखेडा पोलिसांच्या ताब्यात दिले.

२८ जून रोजी सदर आरा. पीस कुरखेडाच्या प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांनी ७ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. पोलिस अधीक्षक नीलोत्पल, अपर अधीक्षक एम. रमेश, सत्यसाई कार्तिक, उपअधीक्षक (अभियान) विशाल नागरगोले व भामरागडचे उपअधीक्षक अमर मोहिते, कुरखेडाचे अपअधीक्षक रवींदद्र भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली कवंडचे प्रभारी अधिकारी उपनि. रीक्षक मंदार शिंदे, विशेष अभियान पथक तसेच सीआरपीएफ ३७ बटालियन सी-कंपनीचे अधिकारी जवान यांनी ही कारवाई पार पाडली.

### दोन मोठ्या हल्ल्यांत सहभाग

२ मे २०१९ रोजी कुरखेडा तालुक्यातील जांभुळखेडा जंगल परिसरात झालेल्या भूसुरूंग स्फोटात १५ जवान शहीद झाले होते. या हल्ल्यामध्ये अंकल उर्फ मन्नु सुलगे पल्लो याचा सक्रीय सहभाग होता. यासोबतच खोब्रामेंढा जंगलात २९ मार्च २०२१ राजी झालेल्या चकमकीतही तो सहभी होता. त्याच्यावर शासनाने सहा लाखांचे बक्षीस जाहीर केले होते.

### दलममधील कार्यकाळ

अंकल पल्लो हा सन २०१२ मध्ये निब कंपनी (छ.ग.) मध्ये सदस्य पदावर भरती होऊन सन २०१७ पर्यंत काम केले. २०१७ मध्ये भामरागड दलममध्ये बदली होऊन सदस्य पदावर काही महिने काम केले. २०१७ ते २०२० पर्यंत कोरची दलममध्ये उप-कमांडर पदावर काम केले. २०२० पासून आजपावेतो महाराष्ट्र छत्तीसगड सिमेवर कवंडे जंगल परिसरात राहून आपले अस्तित्व लपवून पोलीसांची माहिती मिळविण्याचे काम करीत होता.

### जानेवारी २०२२ ते आत्तापर्यंत १०४ नक्षल्यांना अटक

गडचिरोली जिल्हा हा माओवादग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. येथे माओवादी सरकारी मालमत्तेचे नुकसान करणे, सुरक्षा दलाच्या जवानांवर हल्ला करणे व इतर प्रकारच्या सरकारी कामात अडथळे आणून जाळपोळ करणे इ. देशविघातक कृत्य करत असतात. सुरक्षा दलांविरुद्धच्या अनेक हिंसक कारवायांमध्ये सक्रिय सहभाग असलेल्या एका जहाल माओवाद्यास २७ जून रोजी अटक करण्यात आली. गडचिरोली पोलीस दलाच्या प्रभावी माओवाद विरोधी कारवाईमुळे जानेवारी २०२२ ते आतापर्यंत एकुण १०४ माओवाद्यांना अटक करण्यात गडचिरोली पोलीस दलास यश आले आहे.

# चिचडोह बॅरेजचे दरवाजे उघडणार

### नागरिकांनी सतर्कता बाळगावीः प्रशासनाचे आवाहन

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.** २८ : चामोर्शी तालुक्यातील वैनगंगा नदीवर बांधण्यात आलेल्या चिचडोह बॅरेजचे सर्व दरवाजे येत्या ३० जून रोजी सकाळी ८ वाजता उघडण्यात येणार आहेत. यामुळे नदीपात्रात पाण्याचा विसर्ग होणार असून, नदीलगतच्या भागांमध्ये पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता आहे. परिणामी नागरिकांनी सतर्कता बाळगण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

वैनगंगा नदीवर चिचडोह बॅरेज हे चामोर्शी मुख्यालयापासून ५ किमी उत्तरेस आणि प्रसिद्ध मार्कंडा तीर्थक्षेत्रापासून ४ किमी अंतरावर स्थित आहे. जून २०१८ मध्ये पूर्ण झालेल्या या बॅरेजची एकूण लांबी ६९१ मीटर असून, यामध्ये १५ मी. X ९ मी. आकाराचे ३८ लोखंडी दरवाजे बसविण्यात आले आहेत. हे दरवाजे दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ पासून बंद ठेवण्यात आले होते. सध्या बॅरेजमधील पाणीपातळी १८१.८० मीटर असून, जलसाठा ३८.५७ दशलक्ष घनमीटर इतका आहे. या प्रकल्पातून तळोधी-मोकासा उपसा सिंचन योजनेच्या चाचणीसाठी १८१ मीटर पातळी राखण्यात आली होती. परंतु गोसिखुर्द धरणातून ८० क्युमेक्स विसर्ग होणार असून, तसेच पाणलोट क्षेत्रातील नैसर्गिक येवामुळे बॅरेजच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे बॅरेजमधील साठवलेला पाणीसाठा नियंत्रित ठेवण्यासाठी ३० जून रोजी सकाळी ८ वाजता ३९०.१० क्युमेक्स इतका विसर्ग उभ्या दरवा. जांद्वारे व नदीच्या खालील भागातील रिव्हर स्लूइस मार्गे टप्याटप्याने सोडण्यात येणार आहे.

या कालावधीत नदीकाठावरील भागात पाणीपातळी वाढण्याची शक्यता असून, जीवित वा वित्तहानी होऊ नये म्हणून चिचडोह बॅरेजच्या आजूबाजूच्या सर्व गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नागरिक. ांनी नदीकाठावर जाणे टाळावे, तसेच शेतात काम करताना दक्षता घ्यावी. मार्कंडा देवस्थान परिसरातील यात्रेकरू, नदीत आंघोळ करणारे, मासेमारी करणारे, रेती उत्खनन करणारे, पशुपालक व नदीतून ये-जा करणाऱ्यांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी व प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल मोरघडे यांनी केले आहे.

# 'मेक इन गडचिरोली'चा शासनाचा प्रस्ताव कौतुकास्पदः माजी आ. डॉ. होळी

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.** २८ : कृषी विभागाच्या विजन डॉक्युमेंटचा आढावा घेताना गडचिरोली जिल्ह्याचे सह पालकमंत्री ना. ॲड. आशिष जयस्वाल यांनी गडचिरोली जिल्ह्याची ब्रँड ओळख निर्माण करण्यासाठी 'मेक इन गडचिरोली'चा मांडलेला प्रस्ताव खरोखरच कौतुकास्पद असून यासाठी आपण राज्याचे मुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, सह पालकमंत्री ॲड. जयस्वाल यांचे मनापासून अभिनंदन करीत असल्याचे प्रतिपादन गडचिरोली विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार तथा भाजपा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष डॉ. देवराव होळी यांनी केले. या प्रस्तावाला आपण पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

गडचिरोली विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार डॉ. देवराव होळी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मेक इन इंडिया' व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मेक इन महाराष्ट्राच्या संकल्पनेतून गडचिरोली जिल्ह्याच्या विकासासाठी मेक इन गडचिरोली ही नवीन संकल्पना मांडली. त्याकरिता त्यांनी गडचिरोली जिल्ह्यातील १२ ही तालुके पिंजून काढून १ महिना उद्योग क्रांती रथयात्रा काढली. गडचिरोली जिल्ह्यामधील स्थानिक युवक, युवती, पुरुष, महिलांना जिल्ह्यातच रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात, त्यांचे आर्थिक सामाजिक सशक्तीकरण व्हावे, नवीन लहान-मोठे उद्योजक तयार व्हावे जिल्ह्यातच लहान मोठ्या स्थानिक उद्योगांना चालना मिळावी व गडचिरोली जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मदत व्हावी याकरिता त्यांनी मेक इन गडचिरोली ही नव संकल्पना राबविली. आजही त्या दृष्टीने ते प्रयत्न करत आहेत. अशातच जिल्ह्याचे सह पालकमंत्री ना. जयस्वाल यांनी मेक इन गडचिरोली या नावाने गडचिरोली जिल्ह्याची ओळख निर्माण करण्याचा प्रस्ताव मांडला हे खरोखरच कौतुकास्पद व अभिनंदनिय असल्याचे डॉ. देवराव होळी यांनी म्हटले आहे.

उत्तराबधिकारी प्रमाणपत्राबद्दल जाहिरनामा

पेशी तारीख - ३०/०७/२०२५

निशाणी क्रमांक : ७

**कोर्ट विद्यमान श्रीमती व्ही. व्ही. चौधरी, दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ. स्तर), आरमोरी यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्रमांक -२३/२०२५

**अर्जदारः** १) श्रीमती शोभा हिमकांत राऊत, वय ७१ वर्षे, धंदा-काही नाही २) श्री. राहुल हिमकांत राऊत, वय ४५ वर्षे, धंदा-.... ३) श्री. प्रशांत हिमकांत राऊत, वय ४३ वर्षे, धंदा- ...... अर्जदार क्र. १ ते ३ रा. आरमोरी, तह. आरमोरी, जि. गडचिरोली. ४) सौ. प्रगती सुरूभाऊ झरकर, वय ४१ वर्षे, धंदा- गृहिणी, रा. साखरा. तह. जि. गडचिरोली.

-: विरूद्ध :-

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्व आम जनतेस याद्वारे सुचित करण्यात येते की, मृतक हिमकांत जानोबाजी राऊत मौजा-आरमोरी, ता. आरमोरी. जि. गडचिरोली हे दिनांक २०/०४/२०२५ रोजी मयत झाले असून मृतकाचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय तसेच वैयक्तिक कामाकरिता उत्तराबधिकारी प्रमाणपत्र मिळण्यासंदर्भात वरील अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

वरील अर्जदारांनी केलेल्या अर्जावर कोणाची उजर वा हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून एक महिण्याचे आत त्यांनी स्वतः किंवा आपले वकिलामार्फत वा योग्य मुखत्यारामार्फत आपली लेखी उजर वा हरकत दाखल करावी. अन्यथा तद्नंतर हे न्यायालय सदरहू अर्जदाराचा लागलीच पुरावा घेवून उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळण्यासाठी केलेल्या अर्जावर योग्य तो निर्णय देईल.

सबब जाहीर नोटीस दिनांक २५ जून २०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**आदेशान्वये**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, (क. स्तर )**
**आरमोरी**

# शिक्षण, खेळाच्या माध्यमातून समाजाचे व देशाचे नाव उज्वल करावे

### आमदार डॉ. मिलिंद नरोटे : गोडवालाहीत प्रवेश उत्सव



**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.** २८ : शिक्षण हेच यशाची गुरुकिल्ली आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःच्या प्रगतीचा मार्ग शोधावा. शिक्षणाबरोबरच खेळामध्येही सक्रीय सहभाग आवश्यक आहे. खेळाच्या माध्यमातूनदेखील आपण आपल्या समाजाचे व देशाचे नाव उज्वल करू शकतो, असे प्रतिपादन आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांनी केले.

धानोरा तालुक्यातील शासकीय आश्रम शाळा गोडलवाही येथे 'प्रवेश उत्सव' मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांच्या शुभहस्ते फीत कापून व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी ते बोलत होते. यानंतर विद्यार्थ्यांचे औपचारिक स्वागत करण्यात आले व शालेय साहित्याचे वाटप आमदार डॉ. नरोटे यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना आमदार नरोटे यांनी त्यांच्या मातृभाषा गोंडीमध्ये संवाद साधत त्यांच्याशी आत्मीयतेने हितगुज केले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने एसएससी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व सन्मान आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यांच्या यशाचे कौतुक करत पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमानंतर आमदार डॉ. नरोटे यांनी शाळेतील निवास व्यवस्था, स्वयंपाकगृह व भोजन व्यवस्थेची पाहणी केली. अन्न व निवास व्यवस्थेत कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी संबंधित अधिक. ाऱ्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या. विद्यार्थ्यांना कोणत्याही अडचणी न येण्यासाठी प्रशासनाने तत्पर राहावे, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. यावेळेस सरपंच वेणाजी तुलावी, पंचायत समिती शिक्षणाधिकारी हेमलता परसा, मेंढाटोलाच्या केंद्रप्रमुख सोमणकर, आदिवासी एकात्मिक विकास प्रकल्पाचे विद्याधरजी चौधरी, गेडाम, डॉ. पूजा परशुरामकर, भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष अनिल पोहनकर, धानोरा तालुक. ाध्यक्ष साजन गुंडावार, सारंग साळवे, सुभाष धाईत, सुभाष खोबरे, राकेश दास व सहकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

## दुचाकी अपघातात दोन चिमुकले ठार; पती-पत्नी गंभीर

**तालुका प्रतिनिधी**
**एटापल्ली दि.** २८ : दुचाकीवरील नियंत्रण सुटल्यामुळे झालेल्या या अपघातात तीन वर्षाची आरोही व काळी महिण्याचे बाळ ठार तर पती-पत्नी गंभीर जखमी झाल्याची घटना एटापल्ली तालुक्यातील येलचील गावाजवळ आज घडली.

प्राप्त माहितीनुसार विशाल काळे व त्यांच्या पत्नी शीतल काळे हे कुटुंबासह एटापल्ली येथून काही कामानिमित्त दुचाकीने जात होते. दरम्यान, येचली गावाजवळ चालकाचे नियंत्रण सुटल्याने दुचाकी रस्त्याच्या कडेला आदळली. अपघात इतका भीषण होता की, चिमुकल्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर दाम्पत्य गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने चंद्रपूर येथील शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

या हृदयद्रावक घटनेची माहिती तुषार विरमवार व चक्रधर कावळे यांनी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अजय कंकडालवार यांना दिल्यानंतर त्यांनी तात्काळ काळे दाम्पत्याच्या पुढील उपचारांसाठी आर्थिक मदतीचा हात पुढे केला. या अपघाताने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून, काळे कुटुंबाच्या दुःखद यातनांमध्ये प्रशासनानेही तत्काळ मदतीचे पाऊल उचलावे, अशी मागणी होत आहे.

## अमिर्झाचे सरपंच, सदस्य अपात्र

**गडचिरोली** : नालीतल गाळ उपशाचे बिल काढण्याच्या कामाकरिता ४ हजार रूपयांची लाच स्विकारतांना रंगेहात सापडलेल्या गडचिरोली तालुक्यातील अमिर्झाच्या महिला सरपंच सोनाली नागापुरे व सदस्य अजय नागापुरे यांच्यावरील आरोप सिध्द झाल्याने विभागीय आयुक्त कार्यालयाने त्यांना अपात्र घोशित केले आहे. सरपंच व सदस्यांवर कारवाईसाठी हे प्रकरण नागपूर विभागीय आयुक्तांच्या न्यायालयात पोहोचले होते. १० जून रोजी विभागीय अप्पर आयुक्तांनी सरपंच व सदस्य यांच्या अपात्रतेचा आदेश जारी केला.

## माजी आमदार कृष्णा गजबे यांनी जाणल्या पाथरगोटावासीयांच्या समस्या

**आरमोरीः** माजी आमदार कृष्णा गजबे यांनी शनिवार २८ जून रोजी आरमोरी तालुक्यातील पाथरगोटा येथे भेट देऊन गावातील नागरिकांशी विविध विषयांवर संवाद साधला. यावेळी त्यांनी ग्रामस्थांच्या समस्या आणि अडीअडचणी जाणून घेतल्या.

या भेटीदरम्यान माजी आमदार कृष्णा गजबे यांच्यासोबत अशोक दोनाडकर, वेंकट चौधरी, शंकर नखाते, काशिनाथ दोनाडकर, केवळराम प्रधान, मोतीलाल लिंगायत, मोरेश्वर मेश्राम, कैलास दोनाडकर, संतोष प्रधान, हिवराज बुल्ले यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## महाराष्ट्र शासन
## कृषि विभाग
## ई निविदा सुचना क्र. २५ सन २०२४-२५

उपविभागीय कृषि अधिकारी, अहेरी जिल्हा गडचिरोली कार्यालया मार्फत महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाकडुन केवळ गडचिरोली जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंधारण महामंडळ, मृद व जलसंधारण विभाग, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, गडचिरोली नोंदणीकृत मशीनधारक ई. विभागाकडे नोंदणी केलेले नोंदणीकृत १ ते ९ वर्गातील खुला ठेकेदार यांचेकडून खालील नमुद केलेल्या कामाकरीता यासमोर दर्शविलेल्या वर्गवारीच्या कंत्राटदाराकडून बी-१ नमुन्यातील निविदा ई निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहेत. ई-निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in या वेबसाईट वरुन डाऊनलोड करण्यात यावीत.

स्पर्धात्मक निविदा पध्दतीने गडचिरोली जिल्हातील नोंदणीकृत वर्गातील ठेकेदारच निविदा स्पर्धेमध्ये भाग घेऊ शकतील. तसेच सदर निविदे सुचने मध्ये काही बदल होत असल्यास आपणास कळविण्यात येईल. निविदापूर्व बैठक दिनांक- ०१. ०७. २०२५ रोजी वेळ सायं. १७.०० वाजता, स्थळः- उपविभागीय कृषि अधिकारी, कार्यालय अहेरी.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदा सुचना क्रमांक | अंदाजित किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदाराचा नोंदणीकृत वर्गासाठी राखीव |
|---|---|---|---|---|---|
| १ | मानाबा-पुरसलगोंदी गट क्र. १ व पुस्के गट क्र. (२-कामे) | TAOETA. PM 24-25. B-I/12 | 964917/- | ३०- दिवस | गडचिरोली जिल्ह्यातील खुला ठेकेदार |

**उपविभागीय कृषी अधिकारी**
**अहेरी, जि. गडचिरोली**

# लायड्स काली अम्मल हॉस्पिटलमध्ये २०० व्या बाळाचा जन्म



**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.** २८ : हेडरी येथील लॉयड्स काली अम्मल मेमोरियल हॉस्पिटलमध्ये २०० व्या बाळाची प्रसूती नुकतीच नोंदविण्यात आली. हा क्षण गडचिरोली जिल्ह्याने लॉयड्स मेटल्स च्या मदतीने दुर्गम भागात आरोग्यसेवा पुरविण्यात गाठलेल्या एका मोठ्या टप्प्याचा निदर्शक आहे.

लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड (एलएमईएल) चे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन यांनी शुक्रवारी रुग्णालयाला भेट दिली आणि बाळाला आशीर्वाद दिला तसेच पालकांचे अभिनंदन केले. त्यांनी या प्रसंगी लॉयड्स काली अम्मल मेमोरियल हॉस्पिटलमधील समर्पित डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांचे सुद्धा अभिनंदन केले. दुर्गम भागात आरोग्यसेवा पुरवण्याच्या आमच्या भावनेच्या यशाचा आणि लॉयड्स काली अम्मल मेमोरियल (एलकेएएम) हॉस्पिटलवर लोकांनी दाखवलेल्या विश्वासाचा उत्सव साजरा करण्याचा हा प्रसंग आहे. जेव्हा आम्ही हेडरी येथे हे रुग्णालय सुरू केले तेव्हा आम्हाला स्थानिक समुदायांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणायचा होता. आज, आम्हाला आमच्या ध्येयात यशस्वी झाल्याचा आनंद आणि अभिमान आहे, असे ते म्हणाले.

एलकेएएम रुग्णालयाने २९ जानेवारी २०२४ रोजी रुग्णालयात पहिल्या बाळाचा जन्म साजरा केला होता. तेव्हापासून दीड वर्षात, आता रुग्णालयात २०० व्या बाळाची प्रसूती नोंदली गेली आहे. सरासरी, दरमहा ह्या रुग्णालयात ११ हून अधिक बाळंतपण होत आहेत, ही सकारात्मक कहाणी एटापल्ली तालुक्यातील एका दुर्गम भागात घडत आहे. जिथे एलकेएएम हॉस्पिटल स्थानिक समुदायांसाठी वरदान ठरले आहे.

अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांनी सुसज्ज असलेल्या ३० खाटांच्या या मल्टी-स्पेशालिटी रुग्णालयाचा विस्तार १०० खाटांच्या सुविधेत करण्याचा प्रस्ताव आहे ज्यामध्ये अतिरिक्त आरोग्य सेवा विभागांचा समावेश असेल. लॉयड्स मेटल्स तर्फे एलकेएएम हॉस्पिटलमध्ये येणाऱ्या रुग्णांना मोफत वैद्यकीय सल्ला, औषधे, शस्त्रक्रिया, निवास आणि जेवण प्रदान केले जाते, हे येथे उल्लेखनीय.

२०० व्या बाळाच्या पालकांनी बी. प्रभाकरन यांचे मनापासून आभार मानले. हेडरी सारख्या दुर्गम ठिकाणी एलकेएएम हॉस्पिटल स्थापन करण्याचा त्यांचा दूरदर्शी उपक्रम या समुदायासाठी परिवर्तनकारी ठरला आहे.

PNINO-MAHAMAR 2010585
महासागर गडचिरोली
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, एकदा मार्केट, चामोर्शी रोड, गडचिरोली येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१/९९२२९७००२३ स्थानिक संपादक नरेंद्र माहेश्वरी फोन ९९२२९७००३६/०७१३२२३२७७३ (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहिल.)

गडचिरोली
महासागर जिल्हा विशेष
रविवार, दि. २९ जून २०२५ ६

## ३० जूनला ११ वीची प्रवेश यादी होणार जाहीर

**गडचिरोली:** येत्या ३० जून रोजी ११ वीची गुणवत्तेनुसार प्रवेश यादी जाहीर होणार आहे. शैक्षणिक सत्र २०२५-२६ मधील इयत्ता ११ वी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने केली जात आहे. यावर्षी संपूर्ण राज्यात इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश सर्वप्रथम करण्यात येत आहेत. वेळापत्रकाप्रमाणे दिनांक २६ जून २०२५ ला विद्यार्थ्यांना व शाळा महाविद्यालयांना पहिल्या फेरीतील प्रवेश यादी जाहीर करणे निश्चित करण्यात आले होते. परंतू न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे २६ जून ला जाहीर करण्यात येणाऱ्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालय व वरिष्ठ महाविद्यालय संलग्न उच्च माध्यमिक शाळांच्या गुणवत्तेनुसार विद्यार्थी प्रवेश याद्या जाहीर करण्यात आल्या नाहीत. आता नियमित फेरी १ मधील कॅप व कोटा अंतर्गत ३० जून रोजी विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार प्रवेश यादी जाहीर करण्यात येणार आहे. तसेच १ ते ७ जुलै पर्यंत विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन आपला प्रवेश निश्चित करावा लागणार आहे.

# शाळाबाह्य विद्यार्थी शोध मोहिमेची होणार प्रभावी अंमलबजावणी

## सर्व शासकीय यंत्रणा कामाला: मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी घेतला आढावा

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.** २८ : शाळाबाहय, अनियमित व स्थलांतरीत बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात दाखल करून त्यांचे शिक्षण अबाधित राखण्यासाठी दिनांक १ ते १५ जुलै २०२५ या कालावधीमध्ये घरोघरी जावून, बसस्थानक, सार्वजनिक ठिकाणे, बाजारतळ, विटभट्ट्या, सर्व खेडी, गाव, वाडी, तांडे, पाडे, शेतमळयात, जंगलात वास्तव्या करणाऱ्या पालकांच्या शाळाबाहय बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात दाखल करण्याकरीता जिल्हाभरात शोधमोहिम राबविण्यात येणार आहे.



या अंमलबजावणीकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी गाडे अध्यक्षतेखाली जिल्हा पोलीस अधिक्षक, आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी, महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, माध्यमिक शिक्षणाधिकारी प्राथमिक शिक्षणाधिकारी, जिल्हयातील गटशिक्षणाधिकारी, एकात्मीक बाल विकास प्रकल्प अधिकारी, नगरप. रीषद विभागाचे प्रशासन अधिक. ारी या सर्व विभागप्रमुखांची शाळाबाहय अनियमित व स्थलांतरीत बालकांचे सर्वेक्षण प्रभाविपणे अंमलबजावणी करण्यासाठी शुक्रवार २७ जून रोजी सभा घेण्यात आली.

रोजगाराची अनिश्चितता, सामाजिक असुरक्षितता व पालकांच्या मनातील भिती यामुळे बालमजुरी व बालविवाहांचे प्रमाण वाढत आहे. अशा स्थलांतरीत बालकांना शिक्षण हक्क अधिनियम २००९ कलम (४) नुसार शिक्षण हमी कार्ड देण्याची तरतूद करण्यात आली आहे. अशा बाल. कांचा शोध घेवून शाळाबाहय अनियमित बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, बालकांचे पाल. कांसोबत होणारे स्थलांतर थांबविणे, स्थलांतरीत बालकांना त्याच परिसरात शिक्षणाच्या प्रवाहात कायम ठेवणे, स्थलांतरीत होणाऱ्या बालकांना शिक्षण हमी कार्ड देवून त्यांचे गुणवत्तापूर्ण शिक्षण सुरू ठेवणे व बालकांची गळती शुन्यावर आणणे हा या सर्वेक्षणाचा प्रमुख उद्देश आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे यांनी सांगितले.

### अधिकारी, कर्मचाऱ्यांचा होणार गौरव

या सभेत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कोणताही बालक शाळाबाहय राहू नये याकरिता जास्तीत जास्त शाळाबाहय विद्यार्थी मुलांचा शोध घेवून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्यात यावे असे सांगितले. जास्तीत जास्त विद्यार्थी दाखल करणाऱ्या अधिक. ारी, कर्मचारी यांचा सत्कार करण्यात येईल असेही ते म्हणाले. दिनांक १ जुलै ते १५ जूलै २०२५ या कालावधीमध्ये विशेष शोध मोहिम राबवुन ३ ते १८ वयोगटातील शाळाबाहय अनियमित व स्थलांतरीत बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात दाखल करून त्यांचे शिक्षण अबाधित राखण्यासाठी जिल्हयाअंतर्गत येणाऱ्या सर्व कार्यालयांनी समन्वय साध. ून शाळाबाहय बालकांचा शोध घेतला जाणार आहे.

# मुख्यालयी न राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करा

## सोयीनुसार करतात ये-जा ; कोरची तालुक्यातील स्थिती

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.** २८ : राज्य शासनाने कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहूणे बंधनकारक केले आहे. तरीसुध्दा कोरची तालुक्यातील अनेक विभागाचे बहुतांश कर्मचारी, अधिकारी मुख्यालयी राहत नसल्याचे चित्र आहे. अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी न राहता आपआपल्या सोयीनुसार ये-जा करतात. यामुळे कर्मचारी कार्यालयात वेळेवर येत नाहीत. सर्व सामान्य नागरिकांचे प्रचंड हाल होत आहे. जे अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी रहात नाहीत त्यांच्यावर प्रशासनाने कारवाई करावी, अशी नागरिकांची मागणी असली तरी मात्र मुख्यालयी न राहणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई कोण करणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे.



कोरची येथील शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहणे शासनाने बंधनकारक केले होते. परंतु, वर्ग १, २, वर्ग-३ चे अधिकारी व इतर कर्मचारी यांनी शासनाच्या आदेशाचे तीनतेरा वाजवले आहेत. शासनाच्या आदेशाला न जुमानता जिल्ह्याच्या किंवा इतर जिल्हा ठिकाणावरून कर्मचारी ये-जा करतात. हे अधिकारी, कर्मचारी मुख्यालयी न राहता घरभाडे घेतात. अशा बनवाबनवी करणाऱ्या कर्मचारी, अधिकाऱ्यांची चौकशी करून कारवाई करावी, तालुक्यातील ग्रामसेवक, शिक्षक, तलाठी, मंडळ अधिकारी डॉक्टर, आरोग्य कर्मचारी, विद्युत कर्मचारी, कृषीसेवक मुक्कामी राहात नसल्यामुळे सामान्य जनतेला त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे त्यांच्यावर चौकशी करून कारवाई करण्याची नितांत गरज आहे. बहुतांश ग्रामीण शासकीय कर्मचारी शहरात वास्तव्यास राहून नोकरीच्या ठिकाणी दररोज प्रवास करून ये-जा करतात. त्यामुळे ग्रामीण भागाचा विकास खुंटला आहे.

### वरिष्ठ अधिकारी कारवाई करणार काय?

जिल्हा कार्यालय, आरोग्य कार्यालय, तहसील व पंचायत समिती कार्यालयात बैठक असल्याचे सांगून दांड्या मारीत असल्याचेही दिसून येते. शासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखवून अनेक कर्मचारी गरजेनुसार राहणे व मुख्यालयी राहण्याचे कर्तव्य समजून न घेता आपल्या मनमर्जीप्रमाणे वागत असतात. मुख्यालयी न राहणाऱ्या अधिकारी व कर्मचारी वर्गावर वरिष्ठ अधिकारी कारवाई करणार काय? असा प्रश्न निर्माण होत असला तरी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व मुख्य कार्यपालन अधिकारी यांनी लक्ष देण्याची व चौकशी करण्याची गरज आहे.

# योजनांचा लाभ सर्वसामान्यांना मिळवून देण्यासाठी प्रयत्नशीला राहा

## चांगदेव फाये यांचे कार्यकर्त्यांना आवाहन

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.** २८ : सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने अंमलात आणलेल्या विविध योजनांमधून सर्वसामान्य माणसाला दिलासा मिळत आहे. त्यामुळे भाजपा पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी सर्वसामान्य नागरिकांना या योजनांचा अधिकाधिक लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील रहावे, असे प्रतिपादन भाजप तालुकाध्यक्ष माजी पं. स. सदस्य चांगदेव फाये यांनी केले.



भाजप तालुका कुरखेडाच्या वतीने अंगारा- गलखेडा जिल्हा परिषद क्षेत्राची विकसित भारत संकल्प सभा तथा श्यामाप्रसाद मुखर्जी पुण्यतिथी बलिदानदिनी मालेवाडा येथे आयोजित कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. याप्रसंगी भाजप येंगलखेडा पंचायत समिती क्षेत्र प्रमुख रेमाजी किरणापुरे, जिल्हा कार्यकारिणी सदस्य देवदत्त हाडगे, शक्ती केंद्रप्रमुख सुलक्षण नंदनवार आदी उपस्थित होते. याप्रसंगी रेमाजी किरणापुरे व इतर मान्यवरांनीही मार्गदर्शन केले. संचालन व प्रास्ताविक दत्तू हाडगे यांनी केले, तर आभार सुलक्षण नंदनवार यांनी मानले. कार्यक्रमाला रोहिदास उईके, यशवंत नैताम, मुकेश बावणे, विश्वेश्वर कुमरे, उमेश दखणे, रुमालदास गौरकर, व्यंकटराव दाजगाये, पंढरी जाळे आदींसह अंगारा- येंगलखेडा जि. प. क्षेत्रातील शक्तिकेंद्र प्रमुख, बुथप्रमुख व कार्यकर्ता उपस्थित होते.

# 'त्या' पुलाची कंत्राटदार स्वखर्चाने करणार दुरूस्ती

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.** २८ : कोरची तालुक्यातील सावरगाव- कोटगुल- गोंदरी-बेतकाठी (गांग. ीन) नाडेकल ते रामा या मार्गावरील खोब्रागडी नदीवर अतिदुर्गम भागात सुरू असलेल्या मोठ्या पुलाचा एक खांब क्षतीग्रस्त झाला आहे. बांधकाम करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कंत्राटदाराने तो खांब व स्लॅब स्वतःच्या जोखमीवर व खर्चावर काढून नव्याने मजबूत पाया उभारण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कंत्राटदाराला देण्यात आले आहे.



कंत्राटदारने हे काम पूर्ण करण्याचे हमीपत्र दिले असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अविनाश मोरे यांनी सांगितले. ५४ मीटर लांब असलेल्या या पुलाच्या बांधकामास ग्रामीण विकास मंत्रालयाकडून २०१८ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली होती. पुलाचे खांब व स्लॅबचे काम जुलै २०२२ पासून सुरू करण्यात येऊन जुलै २०२३ पर्यंत पूर्ण झाले होते. मात्र, २०२२-२३ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे नदीच्या प्रवाहात मोठे झाड व झुडूपांचा अडथळा निर्माण होऊन प्रवाह बदलल्याने पुलाचा खांब क्रमांक ५ हा कमकुवत झाला. अहगस्ट २०२४ मधील तपासणीच्या आधारे याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने पुलाच्या क्षतीग्रस्त खांबाच्या पुर्नबांधकामासाठी कंत्राटदाराला नोटीस बजावली होती. दोषनिवारण कालावधीत सदर पुलाचे खांब व स्लॅब कंत्राटदाराने स्वतःच्या जोखमीवर व खर्चावर काढून टाकावा व नव्याने मजबूत पाया उभारावा, असे स्पष्ट निर्देश बांधकाम विभागामार्फत देण्यात आले आहेत. हे काम पावसाळ्यानंतर १५ ते २० दिवसांच्या आत पूर्ण करणे बंधनकारक राहणार आहे.

# राजर्षी शाहू महाराजांना जिल्हाभरात अभिवादन

## विविध संस्था, संघटना, शाळेद्वारे विविध सामाजिक उपक्रम उत्साहात

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.** २८ : बहूजन हिताय, बहूजन सुखाय या तत्वज्ञानाने जनतेच्या मनावर अढळ स्थान निर्माण करणारे रयतेचे राजे छत्रपती शाहू महाराज यांची जयंतीदिनी जिल्हाभरात त्यांना अभिवादन करण्यात आले. छत्रपतींच्या जयंतीनिमित्त विविध संस्था, संघटना शाळेद्वारे विविध उपक्रमाच्या माध्यमातून त्यांच्या जीवनकार्यावर तसेच समाजभिमुख कामकाजावर प्रकाश टाकला.

### गडचिरोली येथील विश्रामगृहात अभिवादन



**गडचिरोली:** बामसेफ, भारत मुक्ती मोर्चा, आरपीआय व विविध सहयोगी संघटनातर्फे छत्रपती शाहू महाराज यांची जयंती इंदिरा गांधी चौक स्थित विश्रामगृहात साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी बामसेफचे जिल्हाध्यक्ष भोजराज कान्हेकर होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून आरपीआय जिल्हा उपाध्यक्ष दशरथ साखरे, बहूजन मुक्ती पार्टीचे डोमाजी गेडाम, ओबीसी समाज संघटनेचे अध्यक्ष गुरुदेव भोपये, आरएमबीकेएस शांतीलाल लाडे, राष्ट्रीय किसान मोर्चा दामा. धर शेंडे, खेमदेव हस्ते, पुंडलिक शेंडे आदी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात केलेल्या समाजकार्याबाबत माहिती देत त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. संचालन प्रमोद राऊत तर प्रास्ताविक दामोधर शेंडे यांनी केले, तर आभार शांतीलाल लाडे यांनी मानले.

### शिवाजी विद्यालय, चामोर्शी

**चामोर्शी:** स्थानिक शिवाजी हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी प्राचार्य दीपक पाटील म्हशाखेत्री होते. तर प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्याध्यापक संघमित्रा कांबळे, पर्यवेक्षक सुरेश दासेवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन क्रीडा शिक्षक राकेश खेवले यांनी केले, तर आभार पंकज भिसे यांनी मानले. यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

### जिल्हा परिषद शाळा, कोनसरी

**चामोर्शी:** तालुक्यातील कोनसरी जिल्हा परिषद हायस्कूल येथे सामाजिक लोकशाहीचे प्रणेते, लोकनायक आदर्श राजे, समता, बंधुता यांची शिकवण देणारे, आरक्षणाचे जनक दूरदृष्टीचा कल्याणकारी लोकराजा प्रेरणास्तोत्र, दीन शोषितांचे तारणहार, थोर समाजसुधारक छत्रपती राजश्री शाहू महाराज जयंती निमित्ताने अभिवादन करण्यात आले. यावेळी अभिवादनासह तिन्ही भाषेत विद्यार्थ्यांकडून वाचन घेण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक दीपक शिवणकर, शिक्षक दत्तात्रेय बारापात्रे, विनोद गरमळे, धनराज गेडाम, कुसुम राठोड, शीला डोंगरे, महादेव कुळमेथे आदींसह शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

### मराठा सेवा संघातर्फे गुणवंतांचा सत्कार



मराठा सेवा संघातर्फे गुणवंतांचा सत्कार

**गडचिरोली:** मराठा सेवा संघातर्फे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती कमलताई मुनघाटे हायस्कूलच्या सभागृहात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व मान्यवरांच्या मार्गदर्शनात संपन्न झाला. अध्यक्षस्थानी डॉ. सुरेश लडके होते. तर उद्घाटक डॉ. सचिन मडावी, सहाय्यक समाजकल्याण आयुक्त गड़चिरोली, प्रमुख वक्ता प्रा. डॉ. पंकज नरुले, अरुणा गोहणे, सुलोचना वाघरे, कविता झाडे, शालिग्राम विधाते आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रा. संध्या येलेकर यांनी गायिलेल्या जिजाऊ वंदनेने करण्यात आली. पाहुण्यांचे स्वागत शाल, पुस्तक व स्मृतिचिन्ह देऊन करण्यात आले. यावेळी डॉ. सचिन मडावी यांनी सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून बहूजन विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, वसतिगृह सुविधा यांच्या माध्यमातून शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली. प्रा. नरुले यांनी विद्यार्थ्यांना १२ वीनंतर असणाऱ्या ४८ विद्यापिठातील विविध विषयाच्या संधी, याबद्दल सखोल माहिती दिली. तसेच आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थी ऊच्च शिक्षणापासून वंचित राहू नये, याकरिता ऊपलब्ध असलेल्या विविध फाऊंडेशनच्या व कंपनीच्या शिष्यवृत्तीबद्दल माहीती दिली. याप्रसंगी शालीग्राम विधाते, कविता झाडे, डॉ. सुरेश लडके यांनीसुद्धा यथोचित मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी एसएससी, एचएससीच्या ५२ विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र, स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. प्रास्ताविक व संचालन रामकृष्ण ताजने यांनी केले, तर आभार चंद्रकांत शिवनकर यांनी मानले. यावेळी बहुसंख्य पालक, गुणवंत विद्यार्थी उपस्थित होते.

### जिल्हा परिषद उच्च प्राथ. शाळा तुळशी

**देसाईगंज:** तालुक्यातील तुळशी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत लोकनेते राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी उच्च श्रेणी मुख्याध्यापक आर. जे. वालदे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रभाकर गडपायले, प्रदीप शहारे, तेजराम गायकवाड, कल्पना पिलारे, सीमा मडावी, वैशाली कापगते उपस्थित होते. प्रास्ताविक मार्गदर्शनातून प्रभाकर गडपायले यांनी छत्रपती शाहू महाराज यांचा जीवन कार्याचा परिचय करून दिला. आजचे मोफत व सक्तीचे



शिक्षण ही त्यांचीच देण असल्याचे स्पष्ट केले. जि. प. शाळेतून दिले जाणारे शिक्षण हे मोफत दर्जेदार, पहिलीपासून इंग्रजी, सीबीएससी पॅटर्न असल्यामुळे त्याचा सर्वांनी फायदा घ्यावा व इंग्रजी शाळेकडे वळणारे पाऊल हे जिल्हा परिषद शाळेकडे वळावे, असे कळकळीचे आवाहन केले. संचालन व आभार प्रदर्शन संस्कृती हिने केले.

# कामनगड येथील ५२ शेतकरी, लाभार्थ्यांना आखिव पत्रिका प्राप्त

**तालुका प्रतिनिधी**
**कुरखेडा दि.** २८ : उपअधीक्षक भूमी अभिलेख विभागाने ड्रोनद्वारे घराचे सर्वे करून आखीव पत्रिका तयार केली. प्रती चौरस मीटर पाचरुपयांप्रमाणे शासकीय शुल्क आकारून कामनगड येथील ५२ शेतकऱ्यांचे व लाभार्थ्यांचे आखीव पत्रिकाचे मूळपत्र ग्रामपंचायतचे सरपंच संजय गावडे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

भूमी अभिलेख कार्यालयाचे निमतादार शिशुपाल शेंद्रे यांच्या मार्गदर्शनात भूमी अभिलेख आर. एम. मुरकुटे, भुकरमापक दीपक भांडेकर यांच्या उपस्थितीत सर्व नागरिकांना आखिव पत्रिकेचे महत्त्व विशद करण्यात आले. कृषी विस्तार अधिकारी अशोक ठाकरे यांनी भविष्यात जसा शेतीचा सातबारा असतो. तसेच पद्धतीने गावठाण जागेतील घर बांधकामाकरिता आवश्यक असल्याचे विशद केले. गावातील गावठाण जागा सातबाराप्रमाणे योग्य आहे की अतिक्रमित आहे. यात आपणास माहिती मिळते. तसेच ग्रामपंचायत अधिकारी यांनी नमुना ८ व नमुना १० वर नोंदणीकृत केलेले घराचे मोजमाप योग्य असल्याची खात्री करावी, याबाबत मार्गदर्शन केले. नागरिकांनी आपापल्या आखिव पत्रिका जतन करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी सुकलाल गावडे, केजूराम गावडे, राजू गावडे आदी उपस्थित होते.

### धानोरा येथे सामाजिक न्याय दिन साजरा

**धानोरा:** शहरातील जिल्हा परिषद हायस्कुल येथे २६ जून रोजी लोकराजा, लोकशाहीचे आधारस्तंभ, आरक्षणाचे जनक, राजर्षी शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून साजरी करण्यात आली. याकार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ शिक्षक पी. व्ही. साळवे, प्रमुख अतिथी एन.बी. मेश्राम, पी. बी. तोटावार, आर. जी. मडावी, मोहन देवकते, ओम देशमुख, कीर्ती शिंगरूपवार होते. याप्रसंगी शाहू महाराज यांचे जीवनावर विद्यार्थ्यांची भाषणे झालीत. तोटावर, देवकते यांनी शाहू महाराज यांचे जीवनावर सखोल अशी माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन तथा आभार प्रदर्शन एस एम. रत्नागिरी यांनी केले.

# १४ सावित्रीच्या लेकींना सायकल वितरण

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.** २८ : मिलिंद ज्ञान प्रसारक शिक्षण संस्था वायगाव येथील भारतरत्न डॉ. बी. आर. आंबेडकर विद्यालयाच्या वतीने बाहेर गावावरून ये-जा करणाऱ्या १४ विद्यार्थिनींना मानव विकास मिशन योजनेअंतर्गत बुधवारी (दि.२५) मोफत सायकलचे वितरण करण्यात आले.



यावेळी संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तम उंदिरवाडे, उपाध्यक्ष दशरथ साखरे, सचिव दत्तुजी मेश्राम, शाळा व्यवस्थापन समिती. चे अध्यक्ष तथा संस्था सदस्य डॉ. टी. डी. मेश्राम, संस्थेचे सदस्य देवराव उंदिरवाडे, के. के. तावाडे, दीपक उंदिरवाडे, माजी पं. स. सदस्य विनोद मडावी, मुख्याध्यापक संजय वाढई, शिक्षक प्रतिनिधी रवींद्र उराडे, कालिदास बन्सोड, संदीप कोचे, संजय आलेवार, दुर्गेश वालदे, ए. एस. उत्तरवार, शिपाई आर. एस. वाटे, यादव पुच्छलवार, शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विशेष म्हणजे, बाहेरगावावरून ये-जा करणाऱ्या गरीब व गरजू मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासनाने मानव विकास योजनेअंतर्गत मोफत सायकलीचे वाटप करून जास्तीत जास्त मुलींनी शिक्षण घेऊन शिक्षणाचा दर्जा उंचावावा, यासाठी शासनाने हे पाऊल उचलले आहे. एकंदरीत परिसरातील कोणतीही मुलगी शिक्षणापासून वंचित राहु नये, असे मार्गदर्शन मान्यवरांनी काढले. मुलींना मोफत सायकल मिळाल्याने आनंद व्यक्त करून पालकांनी व परिसरातील नागरिक. ांनी समाधान व्यक्त केले. संचालन स्काऊट शिक्षक कालिदास बन्सोड यांनी केले तर प्रास्ताविक रवींद्र उराडे यांनी केले. आभार संदीप कोचे यांनी मानले.

# शिवणीपाट जिप शाळेत वृक्षारोपण

**तालुका प्रतिनिधी**
**अहेरी दि.** २८ : तालुक्यातील बोरी नजीकच्या शिवणीपाट येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत २६ जून राजर्षी शाहू महाराज जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी वृक्षारा. ेपण करीत अनोख्या पद्धतीने महाराजांना अभिवादन करण्यात आले.



अध्यक्षस्थानी माजी पं. स. सदस्य तथा युवा नेते हर्षवर्धनरावबाबा आत्राम होते. तर प्रमुख अतिथी म्हणून सरपंच मीना वेलादी, शाव्यस अध्यक्ष हनमंतू कुळमेथे, माजी सरपंच मधुकर वेलादी, बोरी ग्रा. पं. उपसरपंच पराग ओलाल्लवार, सामाजिक कार्यकर्ते सुरेंद्र अलोणे, अखिल कोलपाकवार, जावेद अली, विजय कोकीरवार आदी उपस्थित होते. याप्रसंगी सुरेंद्र अलोणे, अखिल कोलपाकवार यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या ऐतिहासिक जिवनकार्यावर प्रकाश टाकला.

# ड्रोनद्वारे घरांचे सर्वेक्षण

**तालुका प्रतिनिधी**
**धानोरा दि.** २८ : उपअधीक्षक भूमि अभिलेख विभागाने ड्रोन द्वारे घराचे सर्वे करून आखीव पत्रिका तयार केली. प्रती चौरस मीटरपाच रुपये प्रमाणे शासकीय शुल्क आकारून कामनगड येथील ४१ शेतकरी व लाभार्थ्यांच्या आखीव पत्रिका सरपंच संजय गावडे यांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

भूमी अभिलेख कार्यालयाचे निमतादार शिशुपाल शेंद्रे यांच्या मार्गदर्शनात नीमतादार मुरकुटे, भुकरमापक दीपक भांडेकर यांच्या उपस्थितीत सर्व नागरिकांना याचे महत्त्व विषद करण्यात आले. कृषी विस्तार अधिकारी अशोक ठाकरे यांनी भविष्यात जसा शेतीचा सात. बारा असतो तसेच पद्धतीने गावठाण जागेतील घर बांधकामाकरिता आवश्यक असल्याचे विषद केले. भूमापन क्रमांक व आपली पत्रिकेतील क्रमांक यांचा ताळमेळ जोडून गावातील गावठाण जागा सातबारा प्रमाणे योग्य आहे की अतिक्रमित आहे, यात आपणास माहिती मिळते. तसेच ग्रामपंचायत अधिकारी यांनी नमुना ८ व नमुना १० वर नोंदणीकृ त केलेले घराचे मोजमाप योग्य असल्याची खात्री करावी याबाबत मार्गदर्शन केले. नागरिकांनी आपापल्या आखीव पत्रिका घेऊन लॅमिनेशन करावे व सदर दस्तऐवज जतन करण्याच्या सूचना दिल्या.

